**नवी मुंबई महानगरपालिका**

**महानगरपालिका सचिव कार्यालय, नवीन मुख्यालय, 3रा मजला, बेलापूर, नवी मुंबई 400614.**

**-: सर्वसाधारण सभेची नोटीस :-**

**दिनांक : 05/09/2019**

नवी मुंबई महानगरपालिकेची **सप्टेंबर महिन्याची सर्वसाधारण सभा, शुक्रवार, दिनांक 13 सप्टेंबर 2019 रोजी सकाळी 11.00 वाजता** बेलापूर, भुखंड क्रमांक 01, सेक्टर 15ए, नवी मुंबई महानगरपालिका, नवीन मुख्यालय येथील 5 व्या मजल्यावरील **राजमाता जिजाऊ सभागृह** येथे खालील विषयांवर विचार करण्यासाठी भरेल :-

1. प्रश्नोत्तरे.

**आयुक्तांकडील प्रस्ताव :**

2. नवी मुंबई महानगरपालिकेच्या भोकरपाडा येथील 450 द.ल.लि. क्षमतेच्या जलशुध्दीकरणे केंद्र येथे पंपगृहाजवळील मेन हेडर लाईन वर 200 मी.मी. व्यासाचे Vaccum Breaker Valve (VCB) बसविणे व त्याअनुषंगिक कामे करणेबाबत.

3.वाशी सेक्टर-3 भुखंड क्र. 12 व 13 येथे समाजमंदीरासह बहुउददेशिय इमारत बांधणे या कामांस सुधारीत प्रशासकिय मंजुरी मिळणेबाबत.

4. नामकरण प्रस्तावाबाबत.

5. नामकरण प्रस्तावाबाबत.

6. बेलापुर विभागातील सेक्टर-8बी येथील रस्त्यांची डांबरीकरणानी सुधारणा करणेबाबत.

7. सीबीडी बेलापुर कल्पतरु सोसायटी ते हायवेपर्यतच्या सेंट्रल नाल्याची सुधारणा करणे या कामांस सुधारीत प्रशासकिय मंजुरी मिळणेबाबत.

8. नेरुळ टीटीसी औदयागिक क्षेत्रातील उरण फाटा ते तुर्भे फ्लायओव्हर पर्यतच्या सर्विस रस्त्याची क्रॉक्रीटीकरणाने सुधारणा करणे कामाच्या सुधारीत रक्कमेबाबत.

9. घणसोली सेक्टर-3 येथील सेंट्रल पार्क मध्ये प्रवेश व पार्क मधील हिरवळीची जागा वापराच्या शुल्क आकारणीबाबत.

**10 . श्री. विशाल राजन डोळस, यांजकडून :-**

(14) प्रभाग क्र. 108 अंतर्गत सेक्टर 50 येथील भुखड क्र. 13 वर उभारण्यात येणा-या शालेय इमारतीत शोभिव बहुउद्देशिय सभागृह, अभ्यासकेंद्राचे प्रयोजन करणे.

**11 ते 13. श्रीम. संगीता संदीप म्हात्रे, यांजकडून :-**

(11) प्रभाग क्र. 45 कोपरखैरणे मधील सेक्टर-3 येथील चिकणेश्वर उदयानाची संरक्षक भिंतीची उंची वाढवुन त्यावर लोखंडी रेलींग बसविणे. (12) “ई” विभाग कार्यालयाचे लादीकरण करणे. (13) “ई” विभाग कार्यालयाची संरक्षक भिंतीची उंची वाढवुन रेलींग बसविणे.

**14 ते 16. श्री. घन:शाम रतन मढवी, यांजकडून :-**

(14) घणसोली सेक्टर-8 स्मशानभुमी येथे मुख्य प्रवेशव्दार, अत्याधुनिक शौचालय, बैठक व्यवस्था, भजन मंडळीसाठी जागा, गार्डन, विदयुत व्यवस्था, पिण्याचे पाणी, स्टोरेज टॅक इ. नियोजनबध्द सुविधा पुरविणे.

(15) घणसोली गावासाठी सामाजिक सुविधेसाठी सिडकोकडुन भुखंड उपलब्ध करुन घेणे. जसे की, खेळाचे मैदान, उदयान, समाज मदीर, हॉस्पीटल, नाना-नानी पार्क, जेष्ठ नागरीक भवन, स्वातंत्रय सैनिक भवन, विरंगुळा केंद्र, महिला सक्षमीकरण केंद्र, वारकरी भवन, आगरी कोळी भवन, मंडई (भाजीपाला, मासळी मार्केट) इत्यादी करीता भुखंड आरक्षित करुन पुढील अंमलबजावणी करणे. (16) घणसोली गाव परिसरात पिण्याचे पाणी समस्या मोठया प्रमाणात भेडसावत असल्याने सेक्टर-8 राजीव गांधी कॉलेजजवळ जी सिडको निर्मित पाण्याची टाकी आहे. ती पुर्ण कार्यान्वीत करुन किंवा त्या ठिकाणी GSR, ESR, पाण्याच्या नवीन टाक्या बांधुन सदर पाणी समस्या कायमस्वरुपी सोडविण्याबाबत नमुद ठराव मंजुर करुन दिलासा देणे.

**17 ते 19. श्रीम. मोनिका लक्ष्मीकांत पाटील, यांजकडून :-**

(17) घणसोली विभागातील प्रभाग क्र. 28 अंतर्गत दैनदिन मार्केटची व्यवस्था करणे. (18) घणसोली विभागातील प्रभाग क्र. 28 अंतर्गत आवश्यक तेथे ओपन जीम उभारणे. (19) घणसोली विभागातील प्रभाग क्र. 28 अंतर्गत दिशा दर्शक फलक लावुन चौकांची दुरुस्ती करुन सुधारणा करणे.

**20 ते 22. श्री. हरिश्चंद्र आत्माराम भोईर, यांजकडून :-**

(20) सेक्टर-11 जुहुगांव येथील गांवदेवी मरिआईमाता मंदीर ते स्वामी नारायण मंदीर जुहुगांव व स्वामी नारायण मंदीर ते सुपरमार्केट जुहुगांव येथील रस्त्यालगतची मोडकळीस आलेली गटारे तोडुन तेथे नवीन गटारे बांधणे. (21) सेक्टर-11 जुहुगांव वाशी नवी मुंबई येथील गांवदेवी मैदानालगत मोडकळीस आलेले खेळणीघर तोडुन तेथे लग्नकार्य व इतर धार्मिकविधी कार्यक्रमासाठी सुसज्ज हॉल बनविणे. (22) सेक्टर-11 जुहुगांव येथील स्वामी नारायण मंदीर ते जुहुगांव स्मशानभुमी पर्यत वृक्षपटटा (Tree Belt) विकसित करणे. सदर ठिकाणी उदयान विकसित करुन लहान मुलांसाठी खेळणीघर व जेष्ठ नागरीकांसाठी विरंगुळा केंद्र बांधणे.

**23 ते 25. श्रीम. रुपाली किस्मत भगत, यांजकडून :-**

(23) नेरुळ सेक्टर-16ए येथील नेरुळ कोळीवाडयाचे उदयान आरक्षण हटवुन त्या ठिकाणी रहिवाशी कोळीवाडा वसाहत म्हणुन आरक्षित करणे. (24) नेरुळ सेक्टर-18 येथील भुखंड क्र. 9, 9ए हा पोलीस चौकी करीता आरक्षित करणे. (25) नेरुळ सेक्टर-16 येथील भुखंड क्रमांक 13 हा समाज मंदीरासाठी आरक्षित करणे.

**26 ते 28. श्रीम. निलम निवृत्ती जगताप, यांजकडून :-**

(26) प्रभाग क्र. 29 घणसोली मधील कै. हुतात्मा जगदीश पाटील क्रिडांगण सिडकोकडुन हस्तांतरीत करुन महानगरपालिकेच्या ताब्यात घेणे. (27) कै. जगदीश पाटील क्रिडांगण सिडकोकडुन हस्तांतरण केल्यानंतर तेथे बहुउददेशिय इमारत बांधणे. (28) प्रभाग क्र. 29 घणसोली मधील उर्वरित भागातील रस्त्याचे UTWT (अल्ट्राथिन व्हाईट टॅपिंग) पध्दतीने सुधारणा करणे.

**29 ते 31. श्री. अशोक बाबुराव गुरखे, यांजकडून :-**

(29) प्रभाग क्र. 102 अंतर्गत सेक्टर-1 शिवाजी चौकाचे कॉंक्रीटीकरण करणे. सदर चौकामध्ये सेक्टर- 1, 2, 3, 8, 8B आणि 9 या ठिकाणी वाहनांची मोठया प्रमाणात वर्दळ असते. सदर चौकामध्ये पावसाळा कालावधीत मोठया प्रमाणात खडडे पडतात. तसेच या ठिकाणच्या वाहतुकीचे मुख्य ठिकाण हे शिवाजी चौक असुन सदर चौकाची दुरावस्था झाली आहे. तरी सदर चौकाचे कॉंक्रीटीकरण करणे. (30) प्रभाग क्र. 102 अंतर्गत सेक्टर-3 मधील महाकाली चौक ते शिवाजी चौकापर्यतच्या रस्त्याचे डांबरीकरण करणे. सदरचा दोन्ही बाजुचा रस्ता हा पावसाळयामुळे खुप खराब झालेला आहे. तरी सदर रस्त्याची डांबरीकरणाने सुधारणा करणे. (31) प्रभाग क्र. 102 मधील सेक्टर-9 सायन पनवेल हायवेलगतच्या पावसाळी गटारांची पुर्नबांधणी करणेबाबत. सेक्टर-9 सायन पनवेल हायवे लगतच्या पावसाळी गटारांची काही प्रमाणात दुरुस्ती करण्यात आली आहे. काही भाग नादुरुस्त आहे. सदर ठिकाणी पावसाळा कालावधीत बेलापुर खिंड टेकडी परिसरातील पाण्याचा प्रवाह हा मोठया प्रमाणात असतो. सदर प्रवाहाने मोठया प्रमाणात बाजुच्या टेकडीची झीज झाल्याने टेकडी परिसरातील माती मोठया प्रमाणात सदर गटारामध्ये येत असल्याने पाण्याच्या प्रवाहात अडथळा निर्माण होत आहे. परिणामी पावसाळा कालावधीत सदरचे पाणी रस्त्यावर येते. तरी सदर सायन पनवेल हायवेलगतच्या उर्वरित गटाराची पुर्नबांधणी करणे.

**32 ते 34. श्री. रामदास बबनराव पवळे, यांजकडून :-**

(32) प्रभाग क्र. 49 सुयश सोसायटीच्या बाजुला गटाराची दुरुस्ती करणे. (33) प्रभाग क्र. 49 सेक्टर-9 रा. फ. नाईक शाळा ते नाल्यापर्यत गटाराची दुरुस्ती करणे. (34) प्रभाग क्र. 49 सेक्टर-10 कंडोनियमअंतर्गत नवीन पाण्याच्या लाईन टाकणे.

**मा. महापौरांच्या आदेशावरून,**

**सही/-**
**(चित्रा बाविस्कर)**
**महानगरपालिका सचिव,**
**नवी मुंबई महानगरपालिका.**

**महापालिका सचिव कार्यालय,**
**नवी मुंबई महानगरपालिका,**
**दिनांक 05 सप्टेंबर 2019.**

<u>नवी मुंबई महानगरपालिका</u>

जा.क्र.नमुंमपा/मस/          /2019
दिनांक   05/09/2019.

प्रति,
**मा. अतिरिक्त आयुक्त -1,**
नवी मुंबई महानगरपालिका.

महोदय,

महानगरपालिकेच्या शुक्रवार, दिनांक 13 सप्टेंबर 2019 रोजी भरणाऱ्या सर्वसाधारण सभेची नोटिस "दैनिक सकाळ", "दैनिक लोकमत" किंवा "दैनिक नवनगर" च्या दिनांक 07 सप्टेंबर 2019 रोजीच्या कोणत्याही एका अंकामध्ये जाहिरात स्वरुपात प्रसिध्द करण्यासाठी सोबत जोडून पाठविण्यात येत आहे.

सोबत :- वरीलप्रमाणे

**महापालिका सचिव,**
**नवी मुंबई महानगरपालिका**

**प्रत : जनसंपर्क अधिकारी, नवी मुंबई महानगरपालिका.**